# जबाबदार मत्स्यव्यवसायाकरिताची आचारसंहिता.

## प्रस्तावना (उपोद्घात)

मत्स्यव्यवसाय हा प्राचिन काळापासून मानवी आहाराचा प्रमुख स्त्रोत असून या व्यवसायात गुतलेल्यांना रोजगार आणि आर्थिक फायदा मिळवून देत आलेला आहे. जलचर साधनसंपत्ती ही निसर्गाची अमर्याद देणगी समजली जात होती. तथापि दुस-या महायुध्दानंतर मत्स्यव्यवसायाचे वाढलेले ज्ञान आणि मत्स्यव्यवसायाचा झालेला जलद विकास यामुळे जलचर साधन संपत्ती ही निसर्गाची अमर्याद देणगी आहे, या समजाऐवजी हे वास्तव समोर आले की, जलजीव स्त्रोतांचे नुतनीकरण होत असले तरी ते अमर्याद नाहीत. त्यामुळे वाढत्या जागतिक लोकसंख्येचे पोषण, सांपत्तीक आणि सामाजिक सौख्य यातील जलजीव स्त्रोतांच्या चिरकाल टिकाऊ सहाय्याकरिता त्यांचे योग्य व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

मध्य सत्तरीत निवडक आर्थिक क्षेत्रांची झालेली विस्तृत ओळख आणि प्रदीर्घ चर्चेनंतर सागरी कायदयावरील संयुक्त राष्ट्रसंघाच्या कराराच्या १९८२ मधील स्वीकृतीमुळे सागरी स्त्रोतांच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनाकरीता नवीन चौकट मिळवून दिलेली आहे. नवीन कायदेशीर सागरी व्यवस्थापनामुळे सागरी किनारा लाभलेल्या राज्यांना त्यांच्या निवडक आर्थिक सागरी क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय स्त्रोतांचा वापर , व्यवस्थापनाचे हक्क आणि जबाबदा-या प्रदान केल्या आहेत. ही निवडक आर्थिक क्षेत्रे एकूण जागतिक मत्स्यव्यवसायाच्या ९० टक्के भागाचा समावेश करुन घेतात. अशा प्रकारचा राष्ट्रीय क्षेत्र विस्तार गरजेचा होता परंतू मत्स्यव्यवसायाचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि स्वीकारार्ह चिरकाल टिकाऊ मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीने केलेल्या

अपु-या उपाययोजनांमुळै ब-याच सागरी राज्यांना आर्थिक व भौतिक स्त्रोतांच्या कमरततेची आलेली प्रचिती यासारख्या आव्हानांना सातत्याने तोंड दयावे लागले. त्या राज्यांनी निवडक आर्थिक क्षेत्रातून अधिकाधिक फायदा मिळविण्याचा शोध घेतला.

अलिकडील काही वर्षात जागतिक मत्स्यव्यवसाय हा व्यापाराभिमुख, खादय उद्योगाचा जोरदारपणे विकसित होणारा विभाग बनला असून मासळी आणि मत्स्य उत्पादने यांना असलेल्या वाढत्या आंतरराष्ट्रीय मागणीस प्रतिसाद देण्याकरीता सागरी राज्यांनी अत्याधुनिक मासेमारी नौकां आणि प्रक्रिया कारखाने यात गुंतवणूक करुन फायदा मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न केलेले आहेत. मत्स्यव्यवसाय स्त्रोत जलद आणि वारंवार होणा-या अनियंत्रित मासेमारीमुळे दिर्घकाळ टिकू शकणार नाहीत हे १९८० च्या अखेरीस स्पष्ट झाले. मत्स्यव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय स्त्रोतांचे जतन

आणि पर्यावरणाचा विचार करणा-या मत्स्यव्यवसाय व्यवस्थापनाच्या नव्या दृष्टीकोनाची तांतडीने गरज होती. निवडक आर्थिक क्षेत्रात आणि क्षेत्राबाहेर होणारी खोल समुद्रातील अनियंत्रित मासेमारी, काही अस्थीर आणि स्थलांतरणीय मत्स्यजाती यामुळे वाईट बनलेली परिस्थिती ही बाब वाढत्या चिंतेचा विषय बनली.

नवीन कल्पनांच्या विकासार्थ मार्च, १९९१ मध्ये बोलाविलेली मत्स्यव्यवसाय समितीची १९ वी बैठक जबाबदार आणि स्वीकारार्ह मत्स्यव्यवसाय यासाठी मार्गदर्शक ठरेल. तद्‌पश्चात जबाबदार मत्स्यव्यवसायासंबंधी १९९२ मध्ये कॅनकून (मेक्सिको ) येथे झालेल्या



आंतरराष्ट्रीय परिषदेने या विषयास उद्देशून आंतरराष्ट्रीय आचार संहिता तयार करण्याची अन्न व कृषी संघटनेस विनंती केली. पर्यावरण आणि विकास या विषयावर १९९२ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेतील २१ व्या विषयास कॅनकून जाहीरनाम्याचे महत्वपूर्ण सहाय्य झाले. हे कॅनकून परिषदेचे फलीत होते. त्यानंतर **अस्थिर आणि अतिस्थलांतरणीय** मत्स्यसाठा या विषयी झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेसाठी अन्न व कृषी संघटनेने महत्वपूर्ण तांत्रिक पाठबळ पुरविले. अन्न व कृषी संघटना परिषदेच्या नोव्हेंबर, १९९३ मध्ये झालेल्या २७ व्या बैठकित **आंतरराष्ट्रीय संरक्षण आणि व्यवस्थापकीय उपाय योजना** या विषयी खोल समुद्रातील मासेमारी नौकांची सहमती वाढविणे बाबतचा करार स्वीकारण्यात आला.

जागतिक मत्स्यव्यवसायातील या आणि अन्य महत्वाच्या वाढी लक्षात घेऊन अन्न आणि कृषी संघटनेच्या नियंत्रक समित्यांनी जबबाबदार मत्स्यव्यवसायाकरीता जागतिक आचार संहिता बनविण्याची शिफारस केली की जी आचार संहिता कायदेशीर दस्तऐवजांशी सुसंगत असेल आणि कायदयाने बंधनकारक न करता सर्वंकष मत्स्यव्यवसायाच्या संरक्षण, व्यवस्थापन आणि विकासाकरीता लागू करण्यास उचित असलेल्या कृतीचे नियम आणि मानके स्थापित करील. अन्न व कृषी संघटनेच्या परिषदेने ३१ ऑक्टोबर १९९५ रोजी सर्वानुमते स्वीकारलेली संहिता पर्यावरणाशी सुसुंगत रितीने जलीय जीवस्त्रोतांचा स्वीकारार्ह रितीने उपयोग करण्याच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रयत्नांची खात्री करण्याकरीता आवश्यक चौकट प्रदान करते.

अन्न व कृषी संघटनेने तिच्या कायदेशीर बंधनानुसार सभासद राज्यांना विशेषतः विकसनशील राज्यांना जबाबदार मत्स्यव्यवसायाच्या आचार संहितेच्या कार्यक्षम अंमलबजावणी करीता मदत करण्याची पूर्णतः जबाबदारी घेतलेली असून साध्य झालेली प्रगती आणि पुढील आवश्यक कृतीबाबत ही संघटना संयुक्त राष्ट्रांच्या गटास अभिप्राय देईल.

## -: परिचय / निवेदन :-

मत्स्यसंवर्धनाचा समावेश असलेला मत्स्यव्यवसाय महत्वपूर्ण खाद्यअन्न स्त्रोत, रोजगार, करमणूक आणि जगभरातील जनतेस आर्थिक सुस्थिती पुरवितो. त्यामुळे सद्याच्या आणि पुढील पिढयांनी जबाबदारीने मत्स्यव्यवसायाचे आयोजन केले पाहीजे. सजीवसृष्टी आणि सभोवतालची परिस्थिती आणि जैवविविधतेचा उचित आदर राखून जलजीव स्त्रोतांचे प्रभावी संरक्षण, व्यवस्थापन आणि विकास यांची खात्री करण्याच्या दृष्टीने जबाबदारीने कारवाई करणा-या वर्तणुकीसाठी वापरावयाचे नियम आणि आंतरराष्ट्रीय मानके ही आचार संहिता तयार ठेवते. ही आचार संहिता मत्स्यव्यवसायाचे पौष्टिक आहार, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्व जाणते आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्राशी संबंधीत सर्वच बाबतीत रस घेते. आचार संहिता स्त्रोतांची जीवशास्त्रीय वैशिष्टये, त्यांचे पर्यावरण आणि ग्राहक व उपभोक्ता यांचे हित संबंध विचारात घेते. राज्ये आणि मत्स्यव्यवसायात गंतलेल्या सर्वांना आचार संहिता लागू करणे आणि तिला प्रभावी बनविणे या करिता प्रात्साहन दिले आहे.